# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व कलावंत मेळावा १४ जून २००६ रोजी सायं. ५.०० वा. महाकवी कालीदास कलामंदिर, नाशिक येथे नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. नाट्य क्षेत्रातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केलेल्या एकूण ६१ रंगकर्मींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला नाशिक येथील नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

## नाट्य लेखन स्पर्धा

८६ व्या नाट्य संमेलनाचा विशेष उपक्रम म्हणून नाट्यलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ९० स्पर्धक सहभागी झाले. स्पर्धेसाठी आलेल्या नव्वद नाट्यसंहितातून परिक्षक मंडळाद्वारे निवडण्यात आलेल्या विजेत्यांना १४ जून रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांची नावे खालील प्रमाणे :-

| पारितोषिक | रक्कम | नाटकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रु. २१,०००/- | सुपारी डॉट कॉम | श्री. योगेश सोमण |
| द्वितीय क्रमांक | रु. ११,०००/- | सोनेरी सकाळ | श्री. ल. मो. बांदेकर |
| तृतीय क्रमांक | रु. ७,०००/- | व्हाईट मिस्चिफ | डॉ. श्रध्दानंद ठाकूर |
| विशेष पुरस्कार | रु. ३,०००/- | सं. पियुष घट-कुंभ अमृताचा | श्री. ल.मो. बांदेकर |
| विशेष पुरस्कार | रु. ३,०००/- | बळी गेला रे बळी | श्री. वि. न. भोळे |

**<u>उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व रु. १,०००/- प्रत्येकी :</u>**

| | |
|---|---|
| 'साधु' | श्री. भगवान कृष्णा हिरे |
| 'तरीही अधांतरी' | सौ. सायली ख. बापट |
| 'धरणग्रस्त' | श्री. सुभाष वामन आहीरे |
| 'द्रोहकन्या' | श्रीमती विभावरी वाकडे |
| 'ही वाट वादळी' | श्री. बालचंद्र उखळकर |

## दिवाळी पहाट

नाट्य परिषदेतर्फे प्रथमच दिनांक २१ ऑक्टोबर २००६ या दिवाळीच्या दिवशी दिवाळी पहाट एक आनंदोत्सव हा मनोरंजनात्मक गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम भव्यदिव्य स्वरुपात नाट्य परिषदेच्या यशवंत नाट्यमंदिरात पहाटे ६.३० वा. आयोजित केला. या कार्यक्रमास नाट्य परिषद सभासद आणि रसिकांना चांगल्याप्रकारे प्रतिसाद दिला.

## यशवंत नाट्यमंदिर

आपले नाट्यगृह मराठी नाटकांना कमीत-कमी दरात उपलब्ध करुन दिले जात असून प्रायोगिक रंगभूमी, बालरंगभूमी आणि हौशी रंगभूमीसाठी नाट्यगृहाच्या भाड्यात पन्नास टक्के सवलत देण्यात येते. नाट्यगृहात मराठी कार्यक्रमांप्रमाणे शुटींग, सभा, इतर भाषिक कार्यक्रम होतात. आपल्या नाट्यगृहास रसिकांचा चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत आहे.